| MHSN060001562024 | नियमित दिवाणी दावा नं. १७/२०२४<br>तुकाराम निकम वि. नितलेश कांबळे वगैरे |
|---|---|

**निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश**

१. वादीने प्रस्तुत दावा निरंतर मनाई ताकीदीकरिता दाखल केला आहे. वादीने दावा अंतिमतः निर्णित होईपावेतो जाबदार अगर तर्फे इसमांनी दावा मिळकतीमध्ये वादीच्या मालकी वहिवाटीत असलेल्या सद्याचे शाळू, हरभरा पिक काढणेस उपभोगणेस कोणत्याही स्वरुपाची हरकत अडथळा करु नये अशी प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे.

२. सदर दावा पुढील मिळकतीबाबत आहे. अ. जिल्हा व तुकडी सांगली, तालुका व पोटतुकडी पैकी जिल्हा परिषद सांगली, तालुका पंचायत समिती मिरज यांचे कक्षेतील मौजे खंडेराजुरी ग्रामपंचायत हद्दीतील जिराईत शेतजमीन मिळकत गट क्र. ३७२, याचे एकूण क्षेत्र हे. १.१८.०० आर. चौ. मिटर, आकार रु. ५.२५ पैसे येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमीन मिळकतीपैकी समाईकातील १/५ हिश्याचे क्षेत्र म्हणजेच क्षेत्र हे. ०.२३.६० आर. चौ. मिटर, आकार रु. ३ आणे २ पै. हिश्याची शेतजमीन मिळकत संपूर्ण तदंगभूत वस्तुहक्क वहिवाटीसहची मिळकत. यासी चतुःसिमा–

| | |
|---|---|
| पुर्वेस | – गट क्र. ३७३ कडील वादी यांची शेतजमीन मिळकत |
| दक्षिणेस | – न.म. पैकी सौ. रमल आठवले यांची वहिवाटीची उर्वरित मिळकत |
| पश्चिमेस | – पायाप्पाचीवाडी रस्ता |
| उत्तरेस | – न.म. पैकी कमल भंडारे यांचे वहिवाटीची मिळकत |

ब. जिल्हा व तुकडी सांगली, तालुका व पोटतुकडी पैकी जिल्हा परिषद सांगली, तालुका पंचायत समिती मिरज यांचे कक्षेतील मौजे खंडेराजुरी ग्रामपंचायत हद्दीतील जिराईत शेतजमीन मिळकत गट क्र. ३७२, याचे एकूण क्षेत्र हे. १.१८.०० आर. चौ. मिटर, आकार रु. ५.२५ पैसे येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमीन मिळकतीपैकी समाईकातील १/५ हिश्याचे क्षेत्र म्हणजेच क्षेत्र हे. ०.२३.६० आर. चौ. मिटर, आकार रु. ३ आणे २ पै. हिश्याची शेतजमीन मिळकत संपूर्ण

तदंगभूत वस्तुहक्क वहिवाटीसहची मिळकत. यासी चतुःसिमा–

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | – | न.म. पैकी वादी यांचे हिस्सेची शेतजमीन मिळकत |
| दक्षिणेस | – | वैष्णवी पाटील यांची मिळकत |
| पश्चिमेस | – | पायाप्पाचीवाडी रस्ता |
| उत्तरेस | – | रमल आठवले यांची मिळकत |

३. वादीचे पुढे कथन आहे की, दावा मिळकत गट क्र. ३७२ ही जाबदारांचे पुर्वहक्कदार रघुनाथ कांबळे, गौतम कांबळे, हणमंत कांबळे, रमल आठवले, कमल भंडारे, मुक्ताबाई कांबळे यांची वडिलार्जित वारसा हक्काची मिळकत असून सन २००४ मध्ये गट क्र. ३७२ मधील हिस्सेदार रघुनाथ कांबळे, गौतम कांबळे, हणमंत कांबळे, रमल आठवले, कमल भंडारे, मुक्ताबाई कांबळे यांच्यामध्ये तोंडी वाटप होऊन तोंडी वाटपाने प्राप्त झालेल्या हिस्सेमध्ये कब्जेवहिवाट करीत होते. त्यानुसार गट नं. ३७२ मधील सहहिस्सेदार गौतम कांबळे यांना वारसाहक्काने व तोंडी वाटपाने प्राप्त झालेल्या हिश्याचे क्षेत्र म्हणजेच अर्ज कलम २–अ कडील मिळकत विक्रीस काढली होती. त्यावेळी अर्जदार हे गट क्र. ३७२ च्या पूर्व बाजुचे लगतहिस्सेदार असल्याने व प्रस्तुत मिळकत बाजारभावे किंमतीपेक्षा जास्त किंमत देण्यास तयार असल्याने गौतम कांबळै यांनी अर्ज कलम २–अ मधील मिळकत दिनांक १९.०९.२०१३ रोजी रजि. खरेदी दस्त क्र. २८३०/२०१३ अन्वये वादीच्या नावे खरेदी करुन कब्जेवहिवाटीत दिली होती. त्यानुसार महसुल रेकॉर्डसदरी नोंद झालेली आहे.

४. तद्‌नंतर गट क्र. ३७२ मधील सहहिस्सेदार मुक्ताबाई कांबळे यांनी सन २०१४ मध्ये याच न्यायालयात रे.दि.मु.नं. २१४/२०१४ कडील दावा निरंतर मनाईकरीता यातील प्रतिवादीचे पुर्वहक्कदार व वादीचेवर दाखल केला होता. तथापी प्रस्तुत दावेकामी मुक्ताबाई कांबळे यांनी कोणतीही पुर्तता केली नसल्याने न्यायालयाने सदरचा दावा काढून टाकलेला आहे. दरम्यानच्या काळात मुक्ताबाई यांनी प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी नं. ३ म्हणजेच यातील अर्जदारांना अर्ज मिळक्त कलम २–ब कडील मिळकत दिनांक ०४.१०.२०२२ रोजीच्या खरेदी दस्त क्र. ६०८४/२०२२ अन्वये वादीच्या नावे खरेदी देऊन कब्जेवहिवाटीत दिलेली होती. त्यानुसार मुक्ताबाई कांबळे यांचे नाव मिळकतीच्या ७/१२ रेकॉर्डवरुन कमी होऊन वादीचे नाव फेरफार नं. १२२८६ अन्वये नोंद झालेले आहे. त्यानुसार दावा मिळकतीमध्ये वादीची प्रत्यक्ष कब्जेवहिवाट सुरु असून त्यांनी दावा मिळकतीमध्ये शेती, मशागत, सुधारणा करुन हरभरा, शाळू,

सुर्यफूल इत्यादी पिके घेत आहेत. अशाप्रकारे त्यांची प्रत्यक्ष कब्जेवहिवाट सुरु असताना शेतजमीन मिळकत गट क्र. ३७२ मधील जाबदाराचे पुर्वहक्कदार व त्यांचे अन्य भाऊबंद यांच्यामध्ये झालेल्या तोंडी वाटप वहिवाटीनुसार प्रत्यक्ष वाटप वहिवाट सुरु असताना व त्याप्रमाणे महसुल रेकॉर्डसदरी तोंडी वाटप वहिवाटीनुसार नोंदी झालेल्या नसल्याने गौतम कांबळे यांनी वादी व अन्य यांचेविरुध्द तोंडी वाटपानुसार सदर मिळकतीचे तोंडी वाटप होऊन मिळण्याकरीता न्यायालयात दावा दाखल केला असून तो न्यायप्रविष्ट आहे.

५. वादीचे पुढे कथन आहे की, प्रतिवादीचे पुर्वहक्कदार हणमंत कांबळे हे मयत झाले असून त्यांचे वारस नोंदी मिळकतीचे रेकॉर्डसदरी अद्यापही झालेली नसताना यातील प्रतिवादी हे या वादीस केवळ त्रास देण्याच्या हेतुने व आर्थीक लाभ उकळण्याच्या लोभापायी अलिकडे यातील अर्जदारांच्या दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीस, मशागतीस, पिक–पाणी घेणेस, उत्पन्न घेणेस हरहरकत, अडथळा करुन अर्जदाराच्या पिकांची व पाणी जाण्याच्या मार्गाचे नुकसान करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अर्जदारांचा मुलगा सुखदेव दावा मिळकतीमध्ये शेती मशागत करुन रोटर मारत असताना जाबदारांनी अर्जदाराच्या वहिवाटीस, शेती मशागतीकरीता रोटर मारण्यास प्रतिबंध करुन अंगावर धावून शिवीगाळ व दमदाटी केल्याने त्याच्याविरुध्द पोलीस स्टेशनकडे तक्रार दाखल करुनही प्रतिवादीविरुध्द पोलीसांनी ठोस कारवाई केली नाही. त्यामुळे पुन्हा प्रतिवादी शेफारुन जाऊन वेळोवेळी वादी व त्यांच्या कुटुंबियांना दावा मिळकतीमध्ये वहिवाट मशागत करण्यास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करीत असल्याने त्याबाबत अर्जदारांनी जाबदारास समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता जाबदार हे अर्जदारास "शेतजमिन आमच्या मालकीच्या आहेत. तुम्हाला वहिवाट करुन पिके घेता येणार नाहीत, मिळकतीशी तुमचा काही संबंध नाही, मिळकतीमध्ये पुन्हा आला तर जीवे मारुन टाकीन व तुमच्या विरुध्द खोटी तक्रार दाखल करुन तुम्हाला जेलमध्ये पाठविण" अशी अरेरावीची भाषा करून तशी खोटी व चुकीची दिशाभुल करणारी खोटी तक्रार मिरज ग्रामिण पोलीस ठाणेकडे देवून वादीना नाहक मानसिक, शारीरीक व आर्थिक त्रास देण्याचा प्रयत्न केला असता मे. ग्रामिण पोलीस ठाणे, मिरज यांनी दिनांक २०/१२/२०२३ रोजी यातील अर्जदार– जाबदारांचा मे. पोलीस ठाणेकडे तसा जबाब नोंदवून सदरचा वाद हा महसुली/दिवाणी न्याय स्वरुपाचे असल्याने योग्य त्या न्यायालयात दाद मागण्याची समज देवून कोणत्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करु नये, जरुर तर योग्य त्या दिवाणी न्यायालयात दाद मागावी असे समजपत्र देवूनही जाबदार हे अत्यंत आडदांट व हेकेखोर स्वभावाचे

असल्याने त्यांच्याकडे मनुष्यबळ असल्याने अंगजोरावर अर्जदारांना नाहक त्रास देवून अर्जदारांच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करुन प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

६. वादीचे पुढे कथन आहे की, वादी हे लष्करी सेवेतून सेवानिवृत्त झालेले इसम असून सेवानिवृत्तीतून आलेल्या रक्कमेतून वर नमद अर्ज कलम २ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीचे खरेदी करुन शेती सुधारणा करून उत्पन्न घेवून उदरनिर्वाह करीत असताना अर्जदारांना अलिकडे एका पायास अपंगत्व आल्याचा गैरफायदा घेवून जाबदार हे वेळोवेळी अर्जदारांना दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीस, मशागतीस, पिकपाणी घेणेस, उत्पन्न घेणेस, वैरण काढणेस वेळोवेळी हरकत अडथळा करीत आहेत. जाबदार हे कायदा न जुमाननारे इसम असून बेकायदेशीरपणे कायदा हातात घेवून अंगजोराच्या बळावर अर्जदाराच्या दावा मिळकतीमधील वहिवाट, पिकपाणी, मशागतीस हरकत अडथळा निर्माण केल्याने अर्जदाराच्या दावा मिळकतीमधील पिकांचे अपरिमित असे नुकसान होत आहे. त्यामुळे अर्जदाराच्या स्वकष्टार्जित मालकी कब्जेवहिवाटीस जाबदारांनी हरकत करु नये, तसेच पिकांचे नुकसान होईल अशी कोणतीही कृत्ये करु नये अशी कायमस्वरूपी मनाई जाबदार अगर तर्फे इसमाना होणेकरीता सदरचा निरंतर मनाईचा दावा अर्जदारांनी जाबदारविरुध्द दाखल केलेला आहे. तथापी, सदरचा दावा गुणागुणावर चालून दाव्याचा अंतिम निकाल होणेस बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्च्या काळात यातील जाबदार हे दावा मिळकतीमधील अर्जदारांच्या कब्जेवहिवाटीस हर–हरकत निर्माण करुन अर्जदाराच्या मालकी हक्काबाबत वाद निर्माण करुन अर्जदारांच्या कब्जेवहिवाटीस, मशागतीस, पिकपाणी करणेस, उत्पन्न घेणेस जाबदारांचे करीत असलेले जोरदार प्रयत्न पाहता सदर दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय होईपावेतो दावा मिळकतीमध्ये अर्जदारांच्या वहिवाट करण्यास कोणत्याहीप्रमाणे हरकत अडथळा करु नयेबाबत जाबदार यांना निरंतर मानाई व कारक ताकीद होणेकरीता सदरचा अर्ज अर्जदारांना दाखल करणे भाग पडले आहे.

७. प्रस्तुत कामी प्रतिवादींनी विहीत मुदतीत त्यांचे म्हणणे सादर न केल्याने त्यांचेविरुध्द विनाम्हणणेचा आदेश पारीत करण्यात आला आहे.

८. वादीचे विधिज्ञाचा तोंडी युक्तिवाद ऐकला. त्यावरुन खालीलप्रमाणे मुद्यांचे निष्कर्ष नोंदविण्यात येतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस त्यांचे बाजूने असलेचे सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी |
| २. | न्यायाचे समतोलत्व वादी यांच्या लाभात असल्याचे वादीने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी |
| ३. | अतंरीम मनाई अनुतोष न दिल्यास वादींचे पैशाने न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होईल, हे वादींनी सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजूर. |

## का र ण मी मां सा

९. वादीने निशाणी ३ कडे गट नं. ३७२ चा ७/१२ उतारा, खाते नं. १८१८९ चा वादीचे नावे खाते उतारा, वादीचे मालकीचा शेतजमीन ग. नं. ३७३ चा ७/१२ उतारा, मिरज ग्रामीण पोलीस स्टेशनकडील समजपत्र व वादीचा लेखीजबाब, रे. दि. मु. नं. २१४/२०१४ चे कामी निशाणी १ वर झालेल्या आदेशाची प्रत, खरेदीदस्त व हातनकाशा, अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडील आरटीएस अपीलाच्या निकालाची प्रत, प्रतिवादीने दाखल केलेल्या दाव्याची प्रत इत्यादी कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

### मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबतः–

१०. प्रस्तुतचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असून त्याचे कारणमीमांसामधील पुर्नरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रित विशद करणेत आलेले आहेत. वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादी अगर त्यांचेतर्फे इसमांनी दावा मिळकतीमध्ये वादीचे मालकी वहिवाटीत असलेल्या सद्याचे शाळू, हरभरा पिक काढणेस, उपभोगास कोणत्याही स्वरुपाची हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातूर्त मनाई आदेशाची मागणी केली आहे. वादी याने अर्जाच्या पृष्ठर्थ निशाणी ३ सोबत गट नं. ३७२ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर उता–याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, त्यावर वादीचे नावाची नोंद आहे. वादीने त्याचे कथनाचे पृष्ठयर्थ मुक्ताबाई रघुनाथ कांबळे यांनी त्याचे हक्कात करुन दिलेल्या खरेदी खताच्या प्रती जोडल्या आहेत. सदर दस्ताचे अवलोकन

केले असता दिसून येते की, वादीने सदर मिळकती योग्य त्या मोबदल्यात खरेदी केल्या आहेत. तसेच त्यावरुन वादीचे नावाची नोंद देखील महसूल दप्तरी लावण्यात आल्याचे दाखल कागदपत्रांवरुन स्पष्ट दिसते. सदर दावा वादीने निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. वादीने त्यांच्या कथनाचे पृष्ठयर्थ वादमिळकतीचा सादर केलेला उतारा वादी यांचे नावाची नोंद सकृतदर्शनी दाखवित आहे. सात बारा उता–याच्या नोंदी मालकी हक्क शाबीत करत नसल्या तरीही सदर दस्त सार्वजनिक असल्याने अंतरिम मनाई हुकुमाचे आदेशाकरीता ग्राहय धरता येईल.

११. वादीचे कथनाप्रमाणे प्रतिवादी त्यांच्या मालकी वहिवाटीत असलेल्या शाळू, हरभरा पिक काढणेस व उपभोगास अडथळा निर्माण करीत आहे. प्रतिवादी त्यांची आडदांग वृत्ती सोडत नसून वादीच्या वहिवाटीस अडथळा करीत असतो त्यामुळे प्रतिवादी यांचेविरुध्द वादीच्या मालकी वहिवाटीत असलेली पिके काढणेस व ती उपभोगणेस हरकत व अडथळा करु नये म्हणून सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. वादीने दाखल केलेल्या दिनांक २०.१२.२०२३ रोजीचे समजपत्रावरुन दिसून येते की, प्रतिवादीने वादीविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार अर्ज केला होता. यावरुन संबंधीत पोलीसांनी वादीस समजपत्र जारी केले होते. वादीने दाखल केलेल्या दिनांक २०.१२.२०२३ रोजीचे जबाबावरुन वादीने त्याची बाजू पोलीसांसमोर मांडल्याचे देखील स्पष्ट होते.

१२. प्रतिवादींना या अर्जापोटी म्हणणे देण्याची संधी देवूनही त्यांनी म्हणणे दाखल केले नाही, त्यामुळे सदरचा अर्ज त्यांचे म्हणणेशिवाय चालविणेत आलेला आहे. प्रतिवादींना जरी अर्जाबाबत काही आक्षेप असता तर त्यांनी हजर झालेनंतर आपले म्हणणे दाखल केले असते परंतु तसे झाले नाही. त्यामुळे मला वादीतर्फे वकील यांनी केलेला युक्तीवाद व दाखल केलेले कागदपत्र यांच्यामध्ये तथ्य वाटते. एकंदरीत दाखल असलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, वादी नोंदणीकृत खरेदीपत्राच्या आधारे सदर दावा दाखल केला आहे. दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, मनाई हुकूमाचा आदेश पारीत केला नाही तर परिस्थिती आहे तशी राहणार नाही. त्यामुळे वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल.

१३. वरील सर्व गोष्टींचा विचार करता, तसेच वादी याने हजर केलेल्या कागदपत्रांवरुन, वादीने त्यांचे बाजूने सकृतदर्शनी दावा व न्यायाचा समतोल आहे, तसेच प्रतिवादी विरुध्द तुर्तातूर्त

ताकीद न दिल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे व वादी हे सदर प्रतिवादीं विरुध्द तुर्तातूर्त मनाई मागण्यास पात्र आहे हे सकृतदर्शनी सिध्द केले आहे. सद्य परिस्थितीत अर्जाचा खर्च अंतिम निकालात समाविष्ट करणे योग्य होईल. सबब, मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवत असून, मुद्दा क्रमांक ४ चे उत्तरा दाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## **आ दे श**

| | |
|---|---|
| **१.** | वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| **२.** | दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादी अगर त्यांचेतर्फे इसमांनी दावा मिळकतीमध्ये वादीच्या मालकी वहिवाटीत असलेल्या शाळू, हरभरा पिक काढणेस, उपभोगास कायदेशीर प्रक्रीयेचा अवलंब न करता कोणत्याही स्वरुपाची हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात येते. |
| **३.** | खर्चाबाबत आदेश नाही. |

RANJANA VIJAY KAMBLE
Digitally signed by RANJANA VIJAY KAMBLE
Date: 2024.04.23 10:57:46 +0530

ठिकाणः मिरज. (श्रीमती आर. व्ही. कांबळे)
दिनांकः–२२.०४.२०२४. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मिरज.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist., Sangli. |
| Date of decision / typed | :- | 22 04 2024 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 22 04 2024 |
| Judgment/order uploaded on | :- | 22 04 2024 |